महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-०५१९/प्र.क्र.१२२/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ०९ ऑगस्ट २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांच्या कार्यालयाच्या इमारतीत *"Providing renovation, addition and upgradation to Electrical Installation"* हे विद्युतविषयक काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस महासंचालक, म.रा, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/पो.आ.कार्या.-विद्युत-संच-मांडणी/ ३८२/ २०१२, दिनांक ०८.०४.२०१९.

ज्ञापन.

पोलीस महासंचालक, म.रा, यांच्या कार्यालयाने पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांच्या कार्यालयाच्या इमारतीत *"Providing renovation, addition and upgradation to Electrical Installation"* हे विद्युतविषयक काम करण्यासाठी रु.२,११,६८,७२०/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उप अभियंता, विद्युत सा.बां. उप विभाग क्र.१, पुणे, यांनी सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत (सा.बां.) विभाग, पुणे, आणि पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सा.बां. विभाग, मंत्रालय, यांनी तपासले असून ते पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मधील कामांसाठी स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे सुधारित केले आहेत आणि त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे:-

अ.क्र. *(१)*	कामाचे नाव *(२)*	खर्चाचे अंदाज *(३)*
१.	*"Providing renovation, addition and upgradation to Electrical Installation in Police Commissioner's office and premises."*	रु.८७,९८,०००/-
२.	*"Providing renovation and addition to main panel, Sub panel, APFC panel with cable arrangement at Police Commissioner's office and premises."*	रु.५७,९४,०००/-
३.	*"Providing renovation to LAN system. Telephone system with supply arrangement in Police Commissioner's office and premises."*	रु.५९,४७,४००/-
एकूण-		रु.२,०५,३९,४००/-

४. त्या अनुसार पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांच्या कार्यालयाच्या इमारतीत *"Providing renovation, addition and upgradation to Electrical Installation"* हे विद्युतविषयक काम करण्यासाठी रु.२,०५,३९,४००/- *(रुपये दोन कोटी, पाच लक्ष, एकोणचाळीस हजार, चारशे फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये या अटीवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. उक्त खर्च हा गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (दत्तमत)(अनिवार्य) (२०५५ ०१६८), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे शासन ज्ञापन, अनौपचारिक संदर्भ क्र.२९०/ २०१९/ इमा.-२, दिनांक २८.०६.२०१९, आणि अनौपचारिक संदर्भ, क्र.२५७/ २०१९/ व्यय-७, दिनांक २०.०७.२०१९, यांच्या अन्वये मिळालेल्या अनुक्रमे सार्वजनिक बांधकाम विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०८०९११२५०३७७२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627,
postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.08.09 11:29:46 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, पुणे शहर.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत (सा.बां.) विभाग, पुणे *(सा.बां. विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Abstract" च्या प्रतींसह).*
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).